# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 10/08/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग २ - रजा

क्रमांक :डीपी/३१-बी-२/अनधिकृत गैरहजर/०१ (२०१८) 6521 /२०२० यवतमाळ दिनांक

1 0 AUG 2020

## आ दे श

खालील नमूद पोलीस कर्मचारी कोणत्याही प्रकारची लेखी, तोंडी सुचना न देता नमुद दिनांकाचे कालावधीमध्ये कर्तव्यावरुन अनधिकृतपणे गैरहजर होते. करीता त्यांची गैरहजर कालावधी कसुरी अहवालानुसार असाधारण रजा (बिनपगारी रजा) मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस कर्म.चे नांव व पदनाम | नेमणुक | गैरहजेरीचा कालावधी | आदेश |
|---|---|---|---|---|
| १ | सफौ/१०६७ रविंद्र कांबळे (पो.मु.) | पो.मु.यवतमाळ | दि. ८/५/२०१८ ते दि.१८/५/२०१८ पर्यंत एकुण ११ दिवस कर्तव्यावरुन अनधिकृत गैरहजर असल्याबाबत. | एकुण ११ दिवस गैरहजर कालावधी बिनपगारी रजा (असाधारण रजा) मंजुर करण्यात येत आहे. |

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

प्रति,

१) सफौ/१०६७ रविंद्र कांबळे , पो.मु.यवतमाळ

प्रत-

वेतन लिपीक-१/डीपीजी लिपीक/ आस्थापना लिपीक/ सआलि ३ /रा.पो.नि.पो.मु.यवतमाळ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

क्रमांकः-सआली-५/५१-डी अ.रजा/विविध/ 6497 २०२०/ यवतमाळ दिनांक - AUG 2020

आदेश

खालील नमुद पोलीस कर्मचा-यानी त्यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे त्यांची रजा, म.ना.सेवा (रजा)नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये सन २०२०-२०२१ या वित्तिय वर्षाकरीता अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे. सदर कर्मचा-यांना कामाची निकड पाहुन आळीपाळीने रजेवर सोडावे .

| अ.क्र. | पो.कर्म.यांचे नाव ब.न. | नेमणुक पो.स्टे. | मंजूर रजा | रजा मंजुरीचे कारण |
|---|---|---|---|---|
| १. | पोशी/2560,निलेश छापेकर | घांटजी | 30 दिवस | स्व:ताहाच्या लग्ना क. |
| २ | पोशी/2374,संदीप मडावी | ---//--- | 30 दिवस | घर बांधण्या करीता |
| ३ | पोशी/2360,शिवाजी शिंदे | लाडखेड | 30 दिवस | धार्मीक कामा करीता |
| ४ | मपोशी/2459,दर्शना आडे | राळेगाव | 30 दिवस | धार्मीक कामा करीता |
| ५ | नापोकॉ/2265,निलेश कुभेकर | घांटजी | 30 दिवस | धार्मीक कामा करीता |
| ६ | पोकॉ/2383,अरविदं चव्हान | ----//--- | 30 दिवस | धार्मीक कामा करीता |
| ७ | पोकॉ/2382,ज्ञानेश्वर बोंबल | --//---- | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| ८ | पोशी/2669,सैय्यद सुभान अली | पो.मुख्यालय | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| ९ | मपोशी/2586,आरती घोगरकर | पुसद शहर | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| १० | मपोना/2138,भाग्यश्री चव्हान | उमरखेड | 30दिवस | बाळाच्या उप. करीता |
| ११ | पोकॉ/2348,अनिल पौळ | ---//-- | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| १२ | पोकॉ/2645,सुनिल काळुसे | --//--- | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| १३ | नापोकॉ/2010,सचिन बंकेवार | --//-- | 30दिवस | घर बांधणी करीता |
| १४ | मपोशी/2086,सुनिता मेश्राम | लाडखेड | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| १५ | नापोका/2176,हनुमान गंगा. | खंडाळा | 30दिवस | भावाच्या लग्ना करीता |
| १६ | पोशी/2269,बंडु सरवदे | पोलीस मुख्यालय | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| १७ | मपोशी/2099,सुर्वणा मेश्राम | दिग्रस | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| १८ | मपोकॉ/2715,सरस्वती मुळे | ---//--- | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| १९ | नापोका/2220]केशव चव्हान | ---//--- | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| २० | पोशी/2352,समाधन कांबडे | अवधुतवाडी | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| २१ | मपोना/2026,जयश्री जारंडे | जिविशा | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| २२ | पोका/2425,राजु शेंडे | शिरपुर | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| २३ | मपोशी/2682,मनिषा झोडे | ----//--- | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| २४ | मपोशी/2471,जया श्रीरामवार | वा.शा.पुसद | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| २५ | मनापोशी/2102,मनिषावांघमारे | यवतमाळ शहर | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| २६ | पोकॉ/2550,अमितकुमार लोखंडे | आर्णि | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| २७ | चापोकॉ/2273,प्रविन इंगोले | महागाव | 30दिवस | धार्मीक कामा करीता |
| २८ | पोशी/2693 ,सुनिल जाधव | पुसद शहर | 30 दिवस | धार्मीक कामा करीता |
| २९ | पोकॉ/2186,शिवहरी सांगडे | लोहारा | 30 दिवस | भावाच्या लग्ना करीता |
| ३० | पोशी/2615,परमेश्वर दराडे | ---//--- | 30 दिवस | धार्मीक कामा करीता |
| ३१ | पोकॉ/2047,उमेश शिंदे | ----//-- | 30 दिवस | धार्मीक कामा करीता |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२ | पोशी/2127,निलेश पाटील | पो.मुख्यालय | 30 दिवस | धार्मीक कामा करीता |
| ३३ | पोशी/2123,रेहानखान अ.मन्नास | वंसतनगर | 30 दिवस | धार्मीक.कामा करीता |
| ३४ | पोशी/ 2255,राहुल निमकर | यवतमाळ शहर | 30 दिवस | धार्मीक कामा करीता |
| ३५ | पोशी/2544,निलेश भवरे | नेर | 30 दिवस | धार्मीक कामा करीता |
| ३६ | नापोशी/2111,प्रणाली कुंमरे | पो.मुख्यालय | 30 दिवस | धार्मीक कामा करीता |
| ३७ | पोहवा/157,राजु मोहुलै | वडकी | 30 दिवस | जुने घर बांधण्या करिता |
| ३८ | पोशी/2016,धिरज गावडे | पो.मुख्यालय | 30 दिवस | लग्ना करिता |
| ३९ | चाहवा/325,संजय पांडे | पारवा | 30दिवस | धार्मीक कामा करिता |

(एम.एम.बागवान)
पोलीस उपअधिक्षक (मुख्या)
पोलीस अधिक्षक यवतमाळ करिता

प्रतिः-

सर्व संबधित ठाणेदार/डिपीजी लिपीक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

6441

क्र.पोअय/प्रलि-८०-सी/सुधारित वे.नि./सेवानिवृत्त सपोनि-अशोक सोळंके/ /२० यवतमाळ, दिनांक :- 10 AUG 2020

**आदेश**

**भाग-१**

सहायक पोलीस निरीक्षक, अशोक नारायण सोळंके, तत्कालीन अर्हताप्राप्त पोलीस उप निरीक्षक (सेवानिवृत्त दि.३१/०८/२०१७) यांना अमरावती ग्रामिण येथे कार्यरत असतांना खालील **स्तंभ अ** प्रमाणे सहायक पोलीस उप निरीक्षक पदात वेतनवाढी मंजूर केल्या होत्या.

वेतन पडताळणी पथक, अमरावती यांनी घेतलेल्या आक्षेपाची पूर्तता करणेच्या अनुषंगाने त्यांना शासन परीपत्रक क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.६९/सेवा-९, दि. ०५.०५.२०१० मध्ये दिलेल्या सुचनानुसार खालील **स्तंभ ब** मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारीत वेतनवाढी मंजूर करण्यात येत आहेत.

१) वेतन बॅण्ड :- सहायक पोलीस उप निरीक्षक- पीबी-१- ५२००-२०२०० ग्रेड वेतन-२८००/-

२) वेतन बॅण्ड :- पोलीस उप निरीक्षक-पीबी-२- ९३००-३४८०० ग्रेड वेतन-४३००/-

३) वेतन बॅण्ड :- सहायक पोलीस निरीक्षक-पीबी-२- ९३००-३४८०० ग्रेड वेतन-४४००/-

**भाग-१**

| स्तंभ ''अ'' | ग्रेडवेतन | स्तंभ ''ब'' | ग्रेडवेतन |
|---|---|---|---|
| रू.१०४७०/- दि.०१.०१.२००६ | २८००/- | रू.१०४७०/- दि.०१.०१.२००६ | २८००/- |
| रू.१०८७०/- दि.०१.०७.२००६ | २८००/- | रू.१०८७०/- दि.०१.०७.२००६ | २८००/- |
| रू.११२९०/- दि.०१.०७.२००७ | २८००/- | रू.११२८०/- दि.०१.०७.२००७ | २८००/- |
| रू.११७२०/ दि.०१.०७.२००८ | २८००/- | रू.११७१०/ दि.०१.०७.२००८ | २८००/- |
| रू.१२१६०/- दि.०१.०७.२००९ | २८००/- | रू.१२१५०/- दि.०१.०७.२००९ | २८००/- |

**भाग-२**

सहायक पोलीस उप निरीक्षक, अशोक नारायण सोळंके,यांना मुंबई पोलीस नियमावली भाग-१ नियम ९०(३) नुसार ३६४ दिवसांकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पोउपनि पदी अभावित पदोन्नती देण्यात आली. त्यामुळे पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामिण यांचे आदेश दि.०७/१०/२००९ अन्वये खालील **स्तंभ अ** प्रमाणे पोलीस उप निरीक्षक पदात वेतनवाढी मंजूर केल्या होत्या. वरीलप्रमाणे त्यांचे वेतनात सुधारणा करण्यात आल्याने त्यांना **स्तंभ ब** मध्ये नमूद केल्याप्रमाणे पोलीस उप निरीक्षक पदात सुधारीत वेतनवाढी मंजूर करण्यात येत आहेत.

| तपशिल | | स्तंभ-अ (दिलेले वेतन) | | स्तंभ-ब (देय वेतन) | |
|---|---|---|---|---|---|
| सपोउपनि ते पोउपनि पदी अभावित पदोन्नती दिनांक व सपोउपनि पदी पदावनत दिनांक | वेतनवाढीचा दिनांक | वेतन | ग्रेड वेतन | वेतन बॅण्ड/वेतनश्रेणीमधील वेतन वेतन + वेतनवाढ = एकूण | ग्रेड वेतन |
| ०१/०१/०६ रोजी सपोउपनि पदात घेत असलेले वेतन | ०१/०१/०६ सपोउपनि | १०४७०/- | २८०० | १०४७०/- | २८०० |
| दि.०३/०२/०६ पासून पोउपनि पदी अभावित पदोन्नती | दि.०३/०२/०६ अभावित पोउपनि | १०४७०+४००= १०८७०/- | ४३०० | १०४७०+४००= १०८७०/- | ४३०० |
| --- | दि.०१/०७/०६ सपोउपनि पदात काल्पनिक वेतनवाढ | १०४७०+४००= १०८७०/- | २८०० | १०४७०+४००= १०८७०/- | २८०० |
| दि.२९/१२/०६ पासून अभावित पोउपनि पदोन्नती रद्द व सपोउनि पदी पदावनत | दि.२९/१२/०६ सपोउपनि | १०८७०/- | २८०० | १०८७०/- | २८०० |
| दि.०२/०१/०७ पासून पोउपनि पदी अभावित पदोन्नती | दि.०२/०१/०७ अभावित पोउपनि | १०८७०+४२०= ११२९०/- | ४३०० | १०८७०+४१०= ११२८०/- | ४३०० |
| --- | दि.०१/०७/०७ सपोउपनि पदात काल्पनिक वेतनवाढ | १०८७०+४२०= ११२९०/- | २८०० | १०८७०+४१०= ११२८०/- | २८०० |
| दि.२९/१२/०७ पासून अभावित पोउपनि पदोन्नती रद्द व | दि.२९/१२/०७ सपोउपनि | ११२९०/- | २८०० | ११२८०/- | २८०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दि.०२/०१/०८ पासून पोउपनि पदी अभावित पदोन्नती | दि.०२/०१/०८ अभावित पोउपनि | ११२९०+४३०= ११७२०/- | ४३०० | ११२८०+४३०= ११७१०/- | ४३०० |
| --- | दि.०१/०७/०८ सपोउपनि पदात काल्पनिक वेतनवाढ | ११२९०+४३०= ११७२०/- | २८०० | ११२८०+४३०= ११७१०/- | २८०० |
| दि.२९/१२/०८ पासून अभावित पोउपनि पदोन्नती रद्द व सपोउनि पदी पदावनत | दि.२९/१२/०८ सपोउपनि | ११७२०/- | २८०० | ११७१०/- | २८०० |
| दि.०१/०१/०९ पासून पोउपनि पदी अभावित पदोन्नती | दि.०१/०१/०९ अभावित पोउपनि | ११७२०+४४०= १२१६०/- | ४३०० | ११७१०+४४०= १२१५०/- | ४३०० |
| पोउपनि पदात नियमित वेतनवाढ | दि.०१/०७/०९ | १२६१०/- | ४३०० | १२१५०+५००= १२६५०/- | ४३०० |
| दि.३०/०१/२०१० पासून अभावित पोउपनि ते **नियमित** पोउपनि पदात पदोन्नती झाली. | | | | | |
| दि.०१/०७/१० पोउपनि पदात नियमित वेतनवाढ | --- | १२६१०+५१०= १३१२०/- | ४३०० | १२६५०+५१०= १३१६०/- | ४३०० |
| दि.०१/०७/११ पोउपनि पदात नियमित वेतनवाढ | --- | १३१२०+५३०= १३६५०/- | ४३०० | १३१६०+५३०= १३६९०/- | ४३०० |
| दि.०१/०७/१२ पोउपनि पदात नियमित वेतनवाढ | --- | १३६५०+५४०= १४१९०/- | ४३०० | १३६९०+५४०= १४२३०/- | ४३०० |
| दि.०१/०७/१३ पोउपनि पदात नियमित वेतनवाढ | --- | १४१९०+५६०= १४७५०/- | ४३०० | १४२३०+५६०= १४७९०/- | ४३०० |
| दि.१७/०६/२०१४ पासून पोउपनि ते सपोनि पदात पदोन्नती झाली. | | | | | |
| **दि.१७/०६/१४ पासून पोउपनि ते सपोनि पदी पदोन्नती** | दि.१७/०६/१४ **सपोनि पदी पदोन्नती** | १४७५०/- | ४४०० | १४७९०/- | ४४०० |
| ---- | दि.०१/०७/१४ कनिष्ठ पदात वेतनवाढ | १४७५०+५८०= १५३३०/- | ४३०० | १४७९०+५८०= १५३७०/- | ४३०० |
| ---- | दि.०१/०७/१४ (विकल्पानुसार सपोनि पदी वेतननिश्चिती) | १५३३०+५९०= १५९२०/- | ४४०० | १५३७०+५९०= १५९६०/- | ४४०० |
| दि.०१/०७/१५ सपोनि पदात नियमित वेतनवाढ | --- | १५९२०+६१०= १६५३०/- | ४४०० | १५९६०+६१०= १६५७०/- | ४४०० |
| दि.०१/०७/१६ सपोनि पदात नियमित वेतनवाढ | --- | १६५३०+६३०= १७१६०/- | ४४०० | १६५७०+६३०= १७२००/- | ४४०० |
| दि.०१/०७/१७ सपोनि पदात नियमित वेतनवाढ | --- | १७१६०+६५०= १७८१०/- | ४४०० | १७२००+६५०= १७८५०/- | ४४०० |

**भाग-३**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेपूर–2018/प्र.क्र.44/सेवा–9, दि.01 जानेवारी, 2019, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम–2019 व शासन अधिसूचना वित विभाग क्रमांक वेपूर 2019/प्र.क्र. 1/सेवा–9, दि.30 जानेवारी 2019 व शासन परिपत्रक क्र.वेपूर–2019/प्र.क्र.8/सेवा–9, दि.20/02/2019 अन्वये महाराष्ट्र राज्यातील अधिकारी व कर्मचारी यांना 7 व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचना दिनांक 01 जानेवारी 2016 पासून लागू करण्यात आलेली आहे. त्यानुसार सपोनि/अशोक नारायण सोळंके (सेवानिवृत्त दि.31.08.2017) यांची या कार्यालयाचे दि.01.07.2019 चे आदेशान्वये दि.01/01/2016 पासून सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये वेतननिश्चिती करण्यात आलेली आहे.

तथापी सेवानिवृत्त सपोनि/अशोक नारायण सोळंके यांचे सेवापुस्तक वेतनपडताळणी करिता, वेतनपडताळणी पथक, अमरावती यांचेकडे पाठविले असता, पडताळणीचे वेळी लेखाधिकारी, वेतनपडताळणी पथक, अमरावती यांनी, सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने शासन परीपत्रक क्र. वेपुर–1209/प्र.क्र.69/सेवा–9,दि.05.05.2010 मध्ये दिलेल्या सुचनानुसार सुधारित वेतननिश्चिती करून वेतनवाढी सुधारित करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने त्यांची वरीलप्रमाणे भाग–1 व भाग–2 नुसार सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतननिश्चिती करण्यात आलेली आहे. त्यामुळे सपोनि/अशोक नारायण सोळंके यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे <u>स्तंभ "अ"</u> मध्ये मंजूर वेतनवाढ

आदेशात फेरबदल करून त्यांना **स्तंभ "ब"** मधे नमुद केल्याप्रमाणे सुधारित वेतनवाढी मंजूर करण्यात येत आहेत.

**वेतन संरचना :–**

| पदनाम | विद्यमान वेतन संरचना–वेतनबॅण्ड | सुधारित वेतन संरचना–वेतन मॅट्रीक्स |
|---|---|---|
| सहायक पोलीस निरीक्षक | 9300–34800 ग्रेड वेतन–4400 | 41800–132300 (S-15) |

| दिलेले वेतन–स्तंभ–अ | | | | देय वेतन–स्तंभ–ब | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दि.01/01/2016 चे मूळ वेतन–16530+4400=20930<br>20930 x 2.57=53790.1 वेतन मॅट्रीक्स (S-15/L-10) नुसार दि.01/01/2016 चे वेतन–54600 | | | | दि.01/01/2016 चे मूळ वेतन–16570+4400=20970<br>20970 x 2.57=53892.9<br>वेतन मॅट्रीक्स (S-15/L-10) नुसार दि.01/01/2016 चे वेतन–54600 | | | |
| वेतनवाढ दिनांक | वेतन | वेतनवाढीची रक्कम | एकूण वेतन | वेतनवाढ दिनांक | वेतन | वेतनवाढीची रक्कम | एकूण वेतन |
| 01/01/2016 | 54600 | –– | 54600 | 01/01/2016 | 54600 | –– | 54600 |
| 01/07/2016 | 54600 | 1600 | 56200 | 01/07/2016 | 54600 | 1600 | 56200 |
| 01/07/2017 | 56200 | 1700 | 57900 | 01/07/2017 | 56200 | 1700 | 57900 |

**वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या वेतननिश्चितीमुळे देय होणारी थकबाकी प्रदान करण्याची कार्यवाही, ही** महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम–2019 व शासन अधिसूचना वित विभाग कमांक वेपूर 2019/प्र.क्र.1/सेवा–9, दि.30 जानेवारी 2019 मधील नियम कमांक 14 मधील तरतुदीनुसार करण्यात यावी. सदरच्या वेतननिश्चितीमध्ये वेतन पडताळणीचे वेळी काही विसंगती आढळून आल्यास किंवा अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास अतिप्रदानाची वसुली भविष्यात प्रदान करण्यात येणाऱ्या कोणत्याही रकमेतून वसुल करण्यात येईल.

( एम.राज कुमार )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

वेतन लिपीक-२ (दोन प्रतीत)

प्रत :-पेन्शन लिपिक/डीपीजी लिपीक, पो.अ.कार्यालय, यवतमाळ यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.

प्रत:- श्री.अशोक नारायण सोळंके, सेवानिवृत्त सहायक पोलीस निरीक्षक, यवतमाळ यांना माहितीकरिता.

क्रमांक-पोअय/आस्था-५/अ.र.रोखीकरण/तायडे/२०२०/ 6502 यवतमाळ दिनांक-

10 AUG 2020

## आदेश

महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ नियम ५०(१) मधिल तरतुदी नुसार तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक-अ.रज.२४०१/सेवा-९/दिनांक-१५/०१/२००१/अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांच्या अजीतरजे खाती शिल्लक असलेल्या अर्जीत रजेचे रोखीकरण करण्यात मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र | नाव पदनाम व ब.नं. | सेवानिवृत्त/मयत दिनांक- | शिल्लक रजा | शेवटचे वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | सफौ/अनिल मधुकर तायडे | ३१/०७/२०२० | ३०० | ६५९०० |

(एम.राज.कुमार)
पोलीस अधिक्षक,यवतमाळ

प्रति,
वेतन लिपीक-१ यांना योग्य कार्यवाही करीता.

प्रत,
जिल्हा कोषागार अधिकरी /पेन्शन लिपीक /राजपंत्र लिपीक यांनामाहीतीस वयोग्य कार्यवाही कारीता

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्रमांक :डीपी/३१-बी २/पोना ०१ रितेश /सुधारीत आ./ 6522 /२०२० यवतमाळ दि. 10 AUG 2020

**वाचा** - डीपी/३१-बी २/पोना ०१ रितेश/अं.आ./३२२७/२०२० यवतमाळ दि.१७/३/२०२०

## सुधारीत अंतिम आदेश

**कसूरी :-**

आपण पो.स्टे.घाटंजी येथे साखरा बिट चे प्रभारी असतांना दि.८/१०/२०१८ रोजी पो.स्टे.घाटंजी येथे फिर्यादी नामे शिवराम सिंह यांच्या तक्रारीवरुन बजाज इलेक्ट्रीकल्स लिमीटेड कंपनीचे विद्युत लाईन उभारणीचे गोडाउन मौजा साखरा गावाजवळ असुन सदर गोडाउनला तारेचे कुंपन केलेले असुन कुंपन मधुन आतमध्ये प्रवेश करुन आरोपी रामभाउ मोहुर्ले यांनी ॲल्युमिनीअम रिंगा चोरुन घेवुन जातांना सिक्युरीटी गार्ड सुनिल चांदेकर व निहाल चव्हाण यांनी आरोपीस पकडले.व त्यांचे चोरी करतांनाचे फोटो काढले.त्याने चोरी करुन जमा केलेल्या ७० ते ८० ॲल्युमिनीअम रिंगा पराटी (कापुस ) मध्ये लपवुन ठेवलेले काढुन दिल्या.व याबाबत घटनेची माहीती कंपनीचे वरीष्ठ अधिकारी यांना दिली.सदर प्रकरणी आरोपी यास फिर्यादी व त्यांचे साथीदार यांनी पो.स्टे.घाटंजी येथे घेवुन गेले.व फिर्यादीवरुन आरोपी रामदास माहुर्ले यांचे विरुध्द अप.क्र.४३९/१९ कलम ३७९ भा.द.वि.चा गुन्हा नोंदविला आहे.

सदर प्रकरणी आपण आरोपी यास गुन्हयात अटक करुन त्याचे कडुन पुर्वी चोरलेल्या मालाबाबत तपास केला नाही.सदर गुन्हयांतील चोरीस गेलेला माल जप्त केला नाही.व त्यांचे इतर साथीदार निष्पन्न केले नाही.तसेच सर्व संबंधित लोकांचे बयाण त्यांना विचारपुस न करता परस्पर नकारार्थी तयार करुन गुन्हयांचे (अ) फायनल क्रमांक १९८/१९ वर तयार करुन मंजुरीस दि.१८/७/२०१९ रोजी उप.वि.पो.अ. यांचे कार्यालयास सादर केले.गुन्हयांचे तपासादरम्यान कसुरदार यांनी चोरी करतांना काढलेले फोटो हस्तगत करुन कागदपत्रामध्ये समाविष्ठ केले नाही.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेला बेजबाबदारपणा कसुरीबाबत आपणांस क्र.डीपी / ३१ -बी/पोना ०१ श्रीवास/कसुरी/४४९/२०१९ यवतमाळ दि.१०/१/२०२० नुसार ' दोन वर्ष वेतनवाढ स्थगिती ' (अपरीणामकारक ) या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण का.दा.नो. स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले. स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने प्रस्तावित कायम करुन या कार्यालयाचे अंतिम आदेश क्र. डीपी/३१-बी २/पोना ०१ रितेश/अं.आ./३२२७/२०२० यवतमाळ दि.१७/३/२०२० अन्वये अंतिम आदेश निर्गमीत करण्यात आला.सदर अंतिम आदेशान्वये आपण नमुद कसुरी प्रकरणी मौखिक म्हणणे मांडणेकरीता आज्ञांकित कक्ष मिळणेबाबत दि.१७/७/२०२० रोजी विनंती अर्ज कार्यालयास सादर केला. सदर विनंती अर्जान्वये केलेली विनंती मान्य करुन दि.४/८/२०२० रोजी आज्ञांकित कक्षामध्ये बोलाविण्यात आले.आज्ञांकीत कक्षांमध्ये सादर केलेले लेखी व मौखीक स्पष्टीकरण हे अंशत: समाधानकारक वाटल्याने खालील प्रमाणे सुधारीत अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

# <u>आदेश</u>

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **पोना /०१ रितेश श्रीवास** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत शिक्षेत अंशत: फेरबदल करुन " दोन वर्ष वेतनवाढ स्थगिती " (अपरीणामकारक ) या शिक्षेऐवजी " **रु.१०,०००/-** " **आर्थिक दंड** ही शिक्षा देण्यात येत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन 60 दिवसांचे आंत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(एम.राज कुमार)
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ.**

**प्रति,**

**पोना /०१ रितेश श्रीवास मार्फत - ठाणेदार, पो.स्टे.पांढरकवडा**

२) सदर आदेशाची मूळ प्रति संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह नावानिशी स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास पाठवावी.

प्रत :- वेतन लिपीक -१/ कर्म.आस्थापना लिपीक / सआली १/डीपीजी लिपीक/उप.वि.पो.अ.पांढरकवडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.

क्र:डिपी/३१-बी-२/स.पो.नि.भेंडे/अंआ/ 6519 २०२०/यवतमाळ दि. 10 AUG 2020

वाचा :- या कार्यालयाचे का.दा.नो/सपोनि-भेंडे/कसुरी/५२८७ यवतमाळ दि. ०२/०७/२०२०

## अंतिम आदेश

**कसूरदार :-** स.पो.नि./दिपमाला भेंडे, नेमणुक नियंत्रण कक्ष, यवतमाळ

**कसुरी :-**

स.पो.नि/दिपमाला भेंडे, आपण पोलीस नियंत्रण कक्ष, यवतमाळ येथे नेमणुकीस आहात, आपली जिविशा यांचे बिनतारी संदेश क्रमांक जिविशा/कोरोना बंदो/२४०१/२०२, दिनांक १७/०६/२०२० अन्वये, १५ होमगार्ड यांचेसह नियंत्रण कक्ष येथुन पो.स्टे. नेर येथे कोविड-१९ बंदोबस्त डयुटी लावण्यात आली असा बिनतारी संदेश नियंत्रण कक्षास प्राप्त झाल्याने, आपणास नियंत्रण कक्ष येथुन फोनद्वारे, सफौ/३८९ गजानन देशपांडे, यांनी पो.स्टे. नेर येथे बंदोबस्त लागल्याचे व दि. १८/०६/२०२० रोजी सकाळी ११:०० वा. पावेतो १५ होमगार्ड सह रिपोर्ट करण्याचे सांगितले व त्याबाबत नोंद स्टे.डा. साना क्र. ३९/२०२० अन्वये २०:४५ वा. घेण्यात आली आहे.

आपण त्याच दिवशी रात्री २१:५० वा. आपली अचानक तब्बेत खराब झाल्याने, वैद्यकीय रजेवर जात असल्याचे, फोनद्वारे नियंत्रण कक्षास डयुटीवर असलेले सफौ /३८९ गजानन देशपांडे यांना कळविल्याने तशी नोंद स्टे.डा. साना क्र. ३९/२०२० अन्वये २०:४५ वा. घेण्यात आली आहे.

आपली पो.स्टे. नेर येथे कोविड -१९ बंदोबस्त डयुटी लागल्याने दि. १७.०६.२०२० चे २१.५० वा. पासुन वैद्यकीय रजेवर गेल्या, आपण दि. १९/०६/२०२० रोजी कर्तव्यावर हजर झाल्याने, तशी नोंद स्टे. डा. साना क्र. २२/२०० अन्वये ११:५० वा. घेण्यात आली आहे. आपण पो.स्टे. नेर येथे कोविड -१९ बंदोबस्त डयुटी लागल्याने बंदोबस्त डयुटी टाळण्याचे उद्देशाने हेतुपुरस्पर वैद्यकीय रजेवर गेले आहे. असे निर्दशनास येते.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा, निष्काळजीपणा, बेजबाबदारपणाचे कसुरी बाबत आपणांस दिनांक ०२/०७/२०२० रोजी " **रु.५०००/-** " आर्थिक **दंड या प्रस्तावित शिक्षेची** कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टिकरण सादर केले आपले स्पष्टिकरण हे अंशत: समाधानाकारक वाटल्याने, तसेच अशा प्रकारची पुनरावृत्ती पुन्हा होणार नाही. या करीता शिक्षा कमी करुन प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक यवतमाळ याव्दारे स.पो.नि/दिपमाला भेंडे, यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **रु. २०००/- (दोन हजार)** आर्थिक दंडाची शिक्षा देत आहे.

(2)

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक ,यवतमाळ

प्रति,

स.पो.नि/दिपमाला भेंडे, नेमणुक नियंत्रण कक्ष यवतमाळ

मार्फत :- प्रभारी अधिकारी नियंत्रण कक्ष, यवतमाळ

२/- उपरोक्त आदेशाची मुळ प्रत संबंधीतांना अदा करुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेऊन ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- वेतन लिपीक-२/अधिकारी आस्थापना लिपीक/डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.

क्रमांक : डीपी/३१-बी-२/पोहवा-१६९१+१/अं.आ/6517/२०२० यवतमाळ दि:-10 AUG 2020

वाचा :- या कार्यालयाचे का.दा.नो. क्र. डिपी/३१-बी-२/ सपोनि -कोरेगांवकर+२/ कसुरी/३८५२/२०२० यवतमाळ दिनांक २०/०५/२०२०

## अंतिम आदेश

कसूरदार :- **१. पोहवा/१६९१ गजानन वाटमोडे नेमणुक पो.स्टे. लाडखेड**
**२. पोशि/२४९६ पवन व्यवहारे, नेमणुक पो.स्टे. लाडखेड**

कसूरी :-

**१. पोहवा/१६९१ गजानन वाटमोडे नेमणुक पो.स्टे. लाडखेड २. पोशि/२४९६ पवन व्यवहारे, नेमणुक पो.स्टे. लाडखेड** आपणास, उप.वि.पो.अ. दारव्हा, यांनी वारंवार अवैध धंद्यावर आळा घालण्यासाठी पो.स्टे. लाडखेड हद्दीतील संपूर्ण अवैध धंदे यांचेवर प्रभावीपणे कार्यवाही करुन संपूर्ण अवैध धंदे बंद करणेबाबत सूचना दिल्या असता व आपणांस याबाबत पत्र व्यवहार करुन सुध्दा आपण उप.वि.पो.अ. दारव्हा, यांचे आदेशाचे पालन न करता हेतूपूरस्पर दुर्लक्ष करुन, जाणीवपूर्वक स्वत:चे आर्थीक फायद्याकरीता अवैध धंदे करण-यांना अभय देवून अवैध धंदे सुरुच ठेवले.

दिनांक १३/०२/२०२० रोजी उप.वि.पो.अ. दारव्हा, यांना मिळालेल्या माहिती प्रमाणे उप.वि.पो.अ. दारव्हा, यांनी त्यांची विशेष पथक कर्मचारी यांना रवाना करुन पो.स्टे लाडखेड हद्दीतील ग्राम महागांव कसबा येथे अवैध धंद्यावर छापा टाकून रेड कार्यवाही करुन मटका जूगार १०८० रु. खेळतांना पांडूरंग शामराव वासनिक रा. देवूरवाडी हा मिळून आल्याने, त्याचे विरुध्द पो.स्टे. लाडखेड अप.क्र १०५/२० कलम १२ (अ) मु.जु.का. अन्वये तसेच महागांव कसबा स्थानिक ठिकाणी आठवडी बाजार येथे मिळालेल्या माहितीवरुन रेड करुन वरली मटका जूगार खेळतांना ४४० रु. आरोपी नामे १)विजय केशवराव पवार रा. महागाव कसबा २) रमेश महादेव मेसेवार हे मिळून आल्याने त्यांचे विरुध्द अप क्र. १०६/२० कलम १२ (अ) मु.जु.का अन्वये कार्यवाही करण्यात आली आहे.

यावरुन असे दिसून येते की, उप.वि.पो.दारव्हा यांनी आपणांस वेळोवेळी गुन्हे बैठकीत तसे मोबाईल फोनवरुन व लेखी आदेश देवून सुध्दा आपण उप.वि.पो.अ. दारव्हा, यांचे आदेशाकडे हेतूपूरस्पर दुर्लक्ष करुन स्वत:चे आर्थीक फायद्याकरीता अवैध धंदे चालविणा-यांना अभय दिल्याचे दिसून येते. तसेच ते उप.वि.पो.अ यांनी दिलेल्या आदेशाचे जाणीपूर्वक पालन करीत नसल्याचे दिसून येते.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेला निष्काळजीपणा व हलगर्जीपणाचे वर्तनाबाबत आपणास **दिनांक २०/०५/२०२० अन्वये " एक महिण्याचे मुळ वेतनाईतका "आर्थिक दंड** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण का.दा.नो. स्विकारुन स्पष्टिकरण सादर केले, आपले

(८)

स्पष्टिकरण हे अंशतः समाधानाकारक वाटल्याने, व भविष्यात अशा प्रकारच्या चुकीची पुनरावृत्ती होणार नाही या करीता शिक्षा कमी करुन, आपणास सक्त ताकीद देण्यात येत आहे.
सदर शिक्षेविरुध्द अपिल अनुज्ञेय नाही.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक ,यवतमाळ.

प्रति,

१. पोहवा/१६९१ गजानन वाटमोडे नेमणुक पो.स्टे. लाडखेड
२. पोशि/२४९६ पवन व्यवहारे, नेमणुक पो.स्टे. लाडखेड

मार्फतः- ठाणेदार, पो.स्टे. लाडखेड

२) सदर आदेशाची मूळ प्रत संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वांक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत :- आस्थापना लिपीक/ सआली -४,५/डीपीजी लिपीक यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.

क्र.पोअय/डिपी/३१-बी/वि.चौ/अं.आ./सपोनि अमोल मुडे/6313 /२०२० यवतमाळ दि. 10 AUG 2020

**सुधारीत अंतिम आदेश**

**वाचा :- पोअय/डिपी/31-बी/वि.चौ/अं.आ./सपोनि- अमोल मुडे/5385/2020 दि. 03/07/2020**

**अपचा-यांचे नांव :- सपोनि अमोल मुडे सध्या नेमणुक पो.स्टे. राळेगांव**

**दोषारोप :-**

पोनि/शाम सोनटक्के ठाणेदार पो.स्टे.राळेगांव यांची दि.२३/१२/२०१९ ते ३१/१२/२०१९ पर्यंत ०९ दिवस अर्जित रजा या कार्यालयाचे बि.सं.दि.२६/१२/२०१९ अन्वये मंजुर करुन रजा कालावधीतील अतिरीक्त कार्यभार हा आपणाकडे देण्यात आला होता. त्या कालावधीत या कार्यालयाचे आदेश क्रमांक :- डिपी/३१-बी/वि.चौ/अं.आ/पोहवा-१२४५ सुरेंद्रसिंग ठाकुर/१४११२/१९ दि.१३/१२/२०१९ अन्वये पोहवा-१२४५ सुरेंद्रसिंग ठाकुर यांना त्यांचे केलेल्या कसुरी प्रकरणी सेवेतुन बडतर्फ (Dismissal) या बाबतचा अंतीम आदेश पारीत करण्यात आला. सदरचा आदेश आपले मार्फतीने नमुद कर्मचारी यांना देवुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन प्रत कार्यालयास सादर करणेबाबत आदेशीत करण्यात आले आहे. बडतर्फ पोहवा-१२४५ सुरेंद्रसिंह ठाकुर यांना आपण दि.२५/१२/२०१९ रोजी प्रत तामील केली आहे. प्रकरणी आपण आदेश स्विकारल्याचे दिनांकापासुन त्यांना सेवेतुन कार्यमुक्त करणे अपेक्षीत होते परंतु आपण तसे न करता त्यांना कर्तव्यावरच ठेवुन त्यांचेकडुन दि.२५/०४/२०२० पावेतो कर्तव्य करुन घेतले. यावरुन आपण आपल्या कर्तव्याप्रती दक्ष नसल्याचे निदर्शनास येत आहे.

उपरोक्त कसुरी प्रकरणी या कार्यालयाचे क्रमांक :- पोअय/डिपी/३१-बी/कादानो/सपोनि- अमोल मुडे/३६५४/२०२० दि. ०४/०५/२०२० अन्वये अपचारी यांना कर्तव्यात केलेल्या निष्काळजीपणाचे वर्तना बाबत **मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपीले) नियम १९५६ मधील तरतुदीनुसार "पुढिल देय वार्षिक वेतनवाढ (भावी वेतनवाढीवर परीणाम न करणारी ) दोन (२) वर्षाकरीता रोखणे" ही शिक्षा का देण्यात येवु नये?** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. अपचारी यांनी सदरची कादानो दि.१९/०५/२०२० रोजी स्वीकारुन त्यावर दि.२३/०५/२०२० रोजी स्पष्टीकरण सादर केले. दिलेले स्पष्टीकरण हे समाधानकारक नसल्याने प्रस्तावित शिक्षा कायम करुन या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअय/डिपी/31-बी/वि.चौ/अं.आ./सपोनि- अमोल मुडे/5385/2020 दि. 03/07/2020 अन्वये अंतीम आदेश निर्गमीत करण्यात आला. सदर अंतीम आदेशान्वये अपचारी यांनी त्यांचे नमुद कसुरी प्रकरणी मौखीक म्हणणे मांडणेकरीता आज्ञांकीत कक्ष मिळणेबाबत दि. 16/07/2020 रोजी विनंती अर्ज कार्यालयास सादर केला. सदर विनंती अर्जान्वये केलेली विनंती मान्य करुन अपचारी यांना दि. 29/07/2020 रोजी आज्ञांकीत कक्षात बोलविण्यात आले. अपचारी यांनी आज्ञांकत कक्षात मांडलेले मौखीक म्हणणे हे अंशत: समाधानकारक वाटल्याने दि.03/07/2020 रोजी देण्यात आलेल्या अंतीम आदेशामध्ये अंशत: बदल करुन सुधारीत अंतीम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे अपचारी **सपोनि अमोल मुडे,** नेमणुक पो.स्टे.राळेगांव यांना त्यांचे उपरोक्त कसुरी प्रकरणी मुंबई पोलीस (शिक्षा आणी अपिले) १९५६ मधील तरतुदीनुसार **"पुढिल देय वार्षिक वेतनवाढ (भावी वेतनवाढीवर परीणाम न करणारी ) एक (१) वर्षाकरीता रोखणे" ही शिक्षा देण्यात येत आहे.**

अपचारी हे जर सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर ते आदेश मिळाल्याचे दिनांका पासुन ६० दिवसाचे आत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

**(एम. राज कुमार)**
**पोलीस अधिक्षक,यवतमाळ**

**प्रति,**

सपोनि अमोल मुडे सध्या नेमणुक पो.स्टे. राळेगांव

**मार्फत :-** प्रभारी अधिकारी, पो.स्टे.राळेगांव

**२/-** सोबत अंतिम आदेशाच्या ०२ प्रति पाठविण्यात येत असुन त्यातील एक प्रत कसुरदारास अदा करुन दुय्यम प्रतीवर

दिनांकित स्वाक्षरी घेवुन ती प्रत इकडील कार्यालयास विनाविलंब परत करावी.

**प्रत :-** आस्थापना लिपीक (अधिकारी)/अधिकारी वेतन लिपीक /डिपीजी लिपीक यांना उचित कार्यवाहीस्तव.

क्र :पोअय/डिपी/३१-बी/वि.चौ/अं.आ/नापोशि-२२२६-६४३/ 6514 /२०२० यवतमाळ दि. 10 AUG 2020

**अंतिम आदेश**

**अपचा-यांचे नांव :-** नापोशि/२२२७ नितीन वास्टर, नेमणुक पो.स्टे. दिग्रस.
नापोशि/६४३ सतिश पांडे, नेमणुक पो.महामार्ग करंजी.

**दोषारोप :-**

१. **नापोशि/६४३ सतिश पांडे,** आपण पो.स्टे.वडगाव रोड येथे नेमणुकीस असतांना आपणास दिनांक १८/०२/२०१५ रोजी पो.स्टे. यवतमाळ शहर येथे लॉकअप गार्ड डयुटीवर पाठविण्यात आले असता कलम ३९९ भादवि चे आरोपी हवालात मध्ये बंद असतांना सुध्दा आपण आरोपीची कोणतीही काळजी घेतली नाही. आपण निष्काळजीपणाने डयुटी करतांना आढळुण आले. तसेच आपण पुर्वी स्था.गु.शा. येथे कार्यरत असल्याने आपले अवैध धंदेवाल्यांशी हितसंबध असल्यामुळे आपण अवैध धंदेवाले यांना छाप्याबाबत पुर्वसुचना देवुन छापा अयशस्वी करीत होते. त्यामुळे अवैध धंदयावर छापा मारण्यास जात असता आपण सोबत जावुन अवैध धंदेवाल्या सोबत हितसंबध असल्याने छापा अयशस्वी करत होते. तसेच आपण दिनांक १४/०५/२०१५ रोजी पो.स्टे. ला नोद अप.क्र. १२३/२०१५ कलम ३८१, ४०९, भादवि मधील आरोपी नापोशि/९९५ निर्मल राठोड यांचेसोबत आपण बारमध्ये जावुन मद्य प्राशन करुन मालखान्यात असलेले ४२,००,०००/- रु. ची रोकड लंपास करण्यास त्यांना उत्तेजित केले. ही बाब प्रशासकीय दुष्टया अतिशय गंभिर आहे. एकंदरीत आपली वर्तनुक ही पोलीस विभागास अशोभनिय आहे.

२. **नापोशि/२२२६ नितीन वास्टर,** आपण पो.स्टे.वडगाव रोड येथे नेमणुकीस असुन आपण पुर्वी स्था.गु.शा. यवतमाळ येथे तैनातीस होते आपला गुन्हेगारी वर्तुळातील गुंडगिरी प्रवृत्तीच्या लोकांसोबत, अवैध धंदे व्यवसायीका सोबत हितसंबध असुन त्यांचे विरुध्द पो.स्टे. ला तक्रार किंवा गुन्हा दाखल झाल्यास आपण पो.स्टे. चे कार्यप्रणालीतील गोपणीय माहीती त्यांना पुरविण्याचे सवईचे आहात. तसेच पो.स्टे. हददीत अवैध धंदे चालकावर छापा टाकण्याचे नियोजित केले असता आपण सदर माहीती संबधीतास पोहचवुन छापा अयशस्वी होणे पात्र ठरत आहे. आपण दिनांक १४/०५/२०१५ रोजी पो.स्टे. ला नोद अप.क्र. १२३/२०१५ कलम ३८१, ४०९, भादवि मधील आरोपी नापोशि/९९५ निर्मल राठोड यांचेसोबत आपण बारमध्ये जावुन मद्य प्राशन करुन मालखान्यात असलेले ४२,००,०००/- रु. ची रोकड लंपास करण्यास उत्तेजित केले आहे. ही बाब प्रशासकीय दुष्टया अतिशय गंभिर आहे. एकंदरीत आपली वर्तनुक ही पोलीस विभागास अशोभनिय आहे.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. डिपी/३१-बी/प्राचौ/६४३/२२०७/२१९४/२०१५-१००६४, दिनांक ०६/०७/२०१५ अन्वये प्राथमीक चौकशी आदेशीत करण्यात येवुन सदर प्राथमीक चौकशीत अपचारी यांचा रोकड लंपास करण्यात कोणताही सहभाग नसल्याचे निष्पन्न झाले आहे. आपल्या उपरोक्त वर्तना बाबत **आपणास पुढील देय वेतनवाढ ०२ वर्षाकरीता (पुढील वेतनवाढीवर परिणाम न करणारी) स्थगीतीची शिक्षा का देण्यात येवु नये?** म्हणुन दिनांक २३/०३/२०२० अन्वये कादानो देण्यात आली. सदरची कादानो स्विकारुन त्यावर दिनांक ०७/०७/२०२० व २२/०७/२०२० रोजी स्पष्टिकरण या कार्यालयास सादर केलेले आहे. सदर स्पष्टिकरण हे समाधानकारक दिसुन आल्याने प्रस्तावित शिक्षेत बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे अपचारी नापोशि/२२२७ नितीन वास्टर व नापोशि/६४३ सतिश पांडे यांनी त्यांचे उपरोक्त कसूरी प्रकरणी सादर केलेले स्पष्टिकरण व मौखिक म्हणने हे समाधानकारक दिसुन आल्याने ते विचारात घेवुन प्रकरण **नस्तिबंद** करण्यात येत आहे.

प्रकरणी अपिल अनुज्ञेय नाही.

**(एम.राज कुमार)**
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ.**

**प्रतीः-** **१) नापोशि/२२२७ नितीन वास्टर,** नेमणुक पो.स्टे. दिग्रस.
२) नापोशि/६४३ सतिश पांडे, नेमणुक पोलीस महामार्ग करंजी.

**मार्फत :-** १)ठाणेदार, पोलीस स्टेशन **दिग्रस** २) प्रभारी अधिकारी पोलीस **महामार्ग करंजी.**

**२/-** सोबत अंतिम आदेशाच्या २ प्रती पाठविण्यात येत असुन त्यातील एक एक प्रत कसुरदारास अदा करुन दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयास विनाविलंब परत करावी.

**प्रत :-** पोउपअधि(मुख्या)/आस्थापना लिपीक(कर्मचारी )/सआली-०२, ०५/वेतन लिपीक- १ /डिपीजी लिपीक यांना उचित कार्यवाहीस्तव.